# ‘न्याय’ योजनेतून दारिद्र्याचा लक्ष्यभेद - राहुल गांधी

पीटीआय, समस्तीपूर, बिहार

**काँग्रेसची गरिबांना** वर्षाला ७२००० रुपये देण्याचे वचन देणारी ‘न्याय’ योजना ही दारिद्र्यावर लक्ष्यभेद हल्ला करण्यासाठी असून त्यासाठी मध्यमवर्गीयांवर कुठलाही कर लादला जाणार नाही असे काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी सांगितले. ते म्हणाले की, या योजनेसाठी लागणारा पैसा मोदींच्या कृपेने अनिल अंबानी यांच्यासारख्यांना दिल्या जात असलेल्या पैशातून उभा केला जाईल.



एनडीएवर हल्ला चढवताना ते म्हणाले की, कुछ नही सब झूठा हैं नरेंद्र मोदी ने लुटा हैं.

उत्तर बिहारमधील शहरात झालेल्या सभेत त्यांनी मोदी यांच्यावर कठोर टीका केली. लालूप्रसाद यादव यांना तुरुंगात वाईट वागणूक दिली जात आहे त्याचे वाईट परिणाम निवडणुकीत भाजपला भोगावे लागतील, असे सांगून ते म्हणाले की, न्याय योजना ही अंबानीसारख्यांना दिल्या जाणाऱ्या पैशातून चालवण्यात येईल. त्यासाठी मध्यमवर्गीयांवर कर लादला जाणार नाही. मोदी लक्ष्यभेद हल्ल्यांचा उल्लेख करतात पण त्यांनी लोकांना रोजगाराचे आश्वासन दिले होते, १५ लाख जमा करण्याचे वचन दिले होते. त्याबद्दल तो बोलत नाहीत. जर आम्हाला सत्ता दिली तर एकही कर्जबाजारी शेतकरी तुरुंगात जाणार नाही. मोदींनी मात्र नीरव मोदी, विजय मल्या यांना कर्ज बुडवूनही मदत केली. आम्ही सामान्य लोक, शेतकरी व कामगार यांच्या पाठीशी उभे राहू, असेही राहुल यांनी सांगितले.

## राहुल गांधी यांच्या विमानात बिघाड

नवी दिल्ली : काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी ज्या विमानाने पाटणा येथे जात होते त्या विमानाच्या इंजिनामध्ये बिघाड झाल्याचे निदर्शनास आल्याने शुक्रवारी ते पुन्हा दिल्लीला वळवावे लागले. त्यामुळे नागरी उड्डाण महासंचालनालयाला (डीजीसीए) याबाबत चौकशीचे आदेश द्यावे लागले आहेत. राहुल गांधी यांनी या प्रकाराबाबत ट्विटरवर लिहिले असून सोबत वैमानिक, सहवैमानिक आणि स्वतःची व्हिडीओ फीतही पोस्ट केली आहे. पाटणा येथे जाणाऱ्या आमच्या विमानामध्ये बिघाड झाला त्यामुळे आम्हाला पुन्हा दिल्लीला जावे लागत असल्याचे ट्वीट गांधी यांनी केले आहे. तांत्रिक बिघाडामुळे हॉकर ८५० एक्सपी विमान व्हीटी-केएनबीला दिल्लीला परतावे लागले, असे डीजीसीएच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. डीजीसीएने प्रचलित पद्धतीनुसार या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. सदर विमान दिल्ली येथे १०.२० मिनिटांनी सुखरूपपणे उतरले, बिघाड निर्माण झाला त्या वेळी विमानामध्ये दोन कर्मचाऱ्यांसह एकूण १० जण होते.

# बालका, एकदा तरी निवडणूक लढवून दाखव!

## ठाण्यात शरद पवारांकडून उद्धव ठाकरे यांची खिल्ली

खास प्रतिनिधी, ठाणे

**विविध निवडणुका** १४ वेळा लढलो आणि त्यात एकदाही पराभव झाला नाही. पण, ज्यांनी कधी मैदानच पाहिले नाही, ते आमच्यावर मैदान सोडून पळाल्याची टीका करीत आहेत, असे सांगत बालका, एकदा तरी निवडणूक लढवून दाखव, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची खिल्ली उडवली.

ठाणे लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आनंद परांजपे यांच्या प्रचारासाठी पवार यांनी शुक्रवारी ठाण्यात जाहीर सभा घेतली.



शरद पवार

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे माझे मित्र होते. आम्ही भांडलो पण, दोघांनीही सलोखा सोडला नाही. परंतु आताचे पक्षप्रमुख उद्धव वेगळे आहेत, असे पवार म्हणाले.

### ‘विकासातील अपयशामुळे मतांसाठी राष्ट्रवादाचे धडे’

**डोंबिवली :** विकासाच्या बाबतीत सपशेल अपयशी ठरलेले नरेंद्र मोदी लोकांना राष्ट्रवादाचे धडे देऊन मते मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु लोक आता खूप हुशार झाले आहेत, त्यांना राष्ट्रवाद काय, हे चांगले माहिती आहे. तो त्यांना शिकविण्याची गरज नाही, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवारी लगावला.


गेल्या पाच वर्षांत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले नाहीत. बेरोजगारांच्या प्रश्नाकडे पाठ फिरवली. युवा शक्तीचा वापर केला नाही. आई-बहिणींच्या रक्षणासाठी ठोस काही केले नाही, असा आरोपही पवार यांनी केला. कल्याणमधील महाआघाडीचे उमेदवार बाबाजी पाटील यांच्या प्रीमिअर मैदानावरील सभेत पवार बोलत होते.

# राज्यांच्या अधिकारांवर निवडणूक आयोगाचा अंकुश

## चंद्राबाबू नायडू यांचा आरोप

पीटीआय, नवी दिल्ली

**निवडणूक आयोग** (ईसी) आपल्या सरकारच्या अधिकारांवर गदा आणून सरकारला त्यांचे कर्तव्य पार पाडू देण्यास मज्जाव करीत असल्याचा आरोप आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी केला.



याबाबत नायडू यांनी मुख्य निवडणूक आयुक्त सुनील अरोरा यांना एक पत्र लिहिले आहे. निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने मुख्यमंत्र्यांना आढावा बैठका घेण्याचा अधिकार नाही, असे आंध्र प्रदेशच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी माध्यमांना सांगितल्याचे नायडू यांनी या पत्रामध्ये म्हटले आहे. अतिरिक्त महासंचालकांनाही (गुप्तवार्ता) मुख्यमंत्र्यांना माहिती देण्यास मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मज्जाव केला आहे, असा आरोपही नायडू यांनी केला.

## ...तर माझ्या निवासस्थानीही छापा टाका - मोदी

सिधी (मध्य प्रदेश) : प्राप्तिकर विभागाने टाकलेले छापे राजकीय हेतूने प्रेरित होते असा पसरलेला समज दूर करण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी येथे केला. कायदा सर्वांसाठी समान आहे, जर आपण काही चुकीचे कृत्य केले असेल तर आपल्या निवासस्थानीही छापा टाकला पाहिजे, असे या वेळी मोदी म्हणाले. मध्य प्रदेशातील एका निवडणूक सभेत मोदी यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून काँग्रेसवर हल्ला चढविला.



काँग्रेसने तुघलक मार्ग निवडणूक घोटाळा केला असून त्यामधील पैशांचा वापर काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांच्या निवडणूक प्रचारासाठी केला जात असल्याचा आरोप मोदी यांनी केला. छाप्यांबद्दल मोदी म्हणाले की, आपल्याला लक्ष्य केले जात आहे, अशी ते ओरड करीत आहेत, मात्र त्यांनी गैर कृत्य केल्यानेच छापे टाकले गेले, असे मोदी म्हणाले.

# देशभरात ३०६ उमेदवार कोट्यधीश

## गंभीर गुन्हे दाखल असलेल्या उमेदवारांची संख्या १५८

प्रतिनिधी, मुंबई

**लोकसभा निवडणुकांच्या** चौथ्या टप्प्यासाठी सध्या देशभरातून ९४३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत, त्यापैकी ३०६ उमेदवारांची मालमत्ता १ कोटी रुपयांहून अधिक आहे. आतापर्यंत पार पडलेल्या ३ टप्प्यांच्या तुलनेत ही संख्या सर्वात कमी आहे.

प्रियांका शिरोळे, विठ्ठल चव्हाण, प्रेम बंशीवाल या महाराष्ट्रातील अपक्ष उमेदवारांनी आपली मालमत्ता शून्य असल्याचे सांगितले आहे. १५८ उमेदवारांवर गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल आहेत, तर २१ उमेदवारांवर महिलांविरोधातील गुन्ह्यांची नोंद आहे.

प्रत्येक उमेदवाराची सरासरी मालमत्ता ४.५३ कोटी रुपये इतकी आहे. त्यातही काँग्रेसच्या ५४ उमेदवारांची मालमत्ता सरासरी २९ कोटींहून अधिक आहे. काँग्रेसचे ५०, भाजपचे ५०, बसपचे २० उमेदवार कोट्यधीशांच्या यादीत समाविष्ट आहेत. मध्य प्रदेशाच्या चिंदवाडातील काँग्रेसचे उमेदवार नकुल नाथ ६६० कोटींहून अधिक मालमत्तेसह पहिल्या क्रमांकावर आहेत. उत्तर-मध्य मुंबईतील काँग्रेसच्या उमेदवार प्रिया दत्त यांचे वार्षिक उत्पन्न सर्वाधिक म्हणजेच १३ कोटींहून अधिक आहे.

गंभीर गुन्हे असलेल्या उमेदवारांमध्ये भाजपचे २०, काँग्रेसचे ९, बसपचे १० आणि ४५ अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. किरकोळ गुन्हे दाखल असलेल्यांची संख्या २१० आहे. ४ उमेदवारांवर अपहरण, ५ जणांवर खून आणि २४ जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा आहे. भडकावू भाषणांशी संबंधित गुन्हे १६ जणांवर आहेत. ३ किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांवर गुन्हे दाखल असल्यास तेथे रेड अलर्ट जाहीर केला जातो. यानुसार ७१ पैकी ३७ मतदारसंघांत रेड अलर्ट जाहीर झाला आहे.

# नरेंद्र मोदींचे करकरेंबद्दल मौन काः काँग्रेस

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात मध्यमवर्गीयांचा सातत्याने उल्लेख केला. यावरून काँग्रेसला लक्ष्य केले. पण त्यांच्या भाषणात गरीब, दलित किंवा अल्पसंख्याकांचा उल्लेख नव्हता, अशी टीका काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी केली.

भाजप उमेदवार प्रज्ञा ठाकूर यांनी शहीद हेमंत करकरेंचा अपमान केल्याबद्दल माफी मागण्याचे नीतीधैर्यदेखील नरेंद्र मोदींना झाले नाही. मुंबईतील लोक करकरे या सुपुत्राचा भाजपने केलेला अपमान कदापि विसरणार नाही, असेही सावंत मोदींच्या भाषणाबद्दल म्हणाले.

# जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक नोटीस मागे

अरुण शर्मा, एक्स्प्रेस वृत्तसेवा, जम्मू

**जम्मू-काश्मीर विधानसभा** निवडणुकीच्या वेळापत्रकाबाबत मतभिन्नता असल्याचे सूचित करून तातडीने जारी केलेली नोटीस अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मागे घेतली.

आगामी विधानसभा निवडणूक २०१९ साठी जिल्हा स्तरावरील नोडल अधिकाऱ्यांबाबतची माहिती पुढील दोन दिवसांमध्ये द्यावी यासाठी सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना नोटीस पाठविण्यात आली होती.

निवडणूक आयुक्त सुनील अरोरा, अशोक लवासा आणि सुशील चंद्र काबरा यांची राज्याचे मुख्य सचिव बीव्हीआर सुब्रह्मण्यम, गृह सचिव शालीन काबरा, पोलीस महासंचालक दिलबागसिंग आणि मुख्य निवडणूक अधिकारी शैलेंद्रकुमार यांच्यासमवेत बैठक झाल्यानंतरपहिली नोटीस पाठविण्यात आली होती.

जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक घेण्याची शक्यता पडताळून पाहण्यासाठी शुक्रवारी बैठक बोलाविण्यात आली होती.

आगामी विधानसभा निवडणूक २०१९ साठी जिल्हा स्तरावरील नोडल अधिकाऱ्यांबाबतची माहिती सादर करण्यासाठी एक स्वरूप आराखडा पाठविण्याचे आदेश आपल्याला देण्यात आले आहेत आणि त्याबाबतची माहिती पुढील दोन दिवसांमध्ये सादर करावयाची आहे, याकडे तातडीची बाब म्हणून पाहावे, असे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या पहिल्या नोटिशीत म्हटले होते.

# प्रसिद्ध पंजाबी गायक दलेर मेहंदी भाजपमध्ये

पीटीआय, नवी दिल्ली

**सुप्रसिद्ध पंजाबी** गायक दलेर मेहंदी यांनी शुक्रवारी केंद्रीय मंत्री विजय गोयल आणि दिल्ली भाजपचे प्रमुख मनोज तिवारी यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

मानवी तस्करीप्रकरणी मेहंदी यांना दोषी ठरविण्यात आले आहे. पतियाळा न्यायालयाने गेल्या वर्षी मेहंदी यांना दोन वर्षांच्या कारावासाची आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली होती. त्यांची जातमुचलक्यावर सुटका करण्यात आली होती.

वायव्य दिल्ली मतदारसंघातील भाजपचे उमेदवार हंसराज हंस, केंद्रीय मंत्री हर्षवर्धन आणि पक्षाचे अन्य नेतेही या वेळी उपस्थित होते. मेहंदी यांच्या कन्येचा विवाह हंसराज हंस यांच्या मुलाशी झाला आहे. मेहंदी यांना २०१३ मध्ये दिल्ली विधानसभा निवडणूक लढण्याची इच्छा होती, त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.









TATA

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०१८ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | १९,१२९.५५ | १७,१७३.८७ | १६,२८०.९४ | ७०,६१०.९२ | ६०,५१९.३७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ३,८७६.२४ | ३,५१३.६३ | ३,३६३.२७ | १६,३४१.४८ | १०,००४.५४ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ३,८६५.२२ | ३,७७३.३० | १,७५५.८७ | १६,२२७.२५ | ६,६३८.२५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | २,४९१.०९ | २,४५६.०९ | १,०३०.९३ | १०,५३३.१९ | ४,१६९.५५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | २,५२९.८४ | २,३५१.१५ | १,०४३.७९ | १०,४८२.९७ | ४,१०८.४३ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | ६९,३०८.५९ | ६०,३६८.७२ |
| नेट वर्थ | | | | ७२,७२९.७१ | ६३,७८९.८४ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | | | | १४,३४६.४१ | १०,३४५.७९ |
| नेट डेब्ट इक्विटी रेशो | | | | ०.४२ | ०.१५ |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | २१.३७ | २१.०५ | ९.३८ | ९०.४१ | ३८.५७ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २१.३६ | २१.०५ | ९.३८ | ९०.४० | ३८.५६ |
| डिबेंचर विमोचन राखीव | | | | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | | | | ६.२३ | ५.७३ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | | | | ९.५७ | ७.०३ |

**३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३१.०३.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३१.१२.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष | ३१.०३.२०१८ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ४२,४२३.८६ | ३८,८५३.८८ | ३३,७०५.०६ | १५७,६६८.९९ | १२४,१०९.६९ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ४,२४१.०१ | ३,१९०.९२ | ३,८१०.३६ | १६,०२६.६९ | ११,३५६.९७ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ४,२५२.५० | ३,२२३.३३ | १५,१८६.५० | १५,९०५.७२ | २०,९५६.०९ |
| अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | २,३५३.४४ | १,८१६.६८ | १४,६०२.५४ | ९,१८७.२९ | १७,५६३.७६ |
| खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | (५८.१९) | (६३.६१) | ८५.४८ | (८८.९६) | १९९.०५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | २,१९४.३६ | १,९२५.२८ | १९,१९७.१९ | ९,१०६.१२ | १४,६८४.८० |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४४.९४ | १,१४४.९४ | १,१४४.९५ | १,१४४.९४ | १,११४.९५ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज | | | | ६७,८६९.६० | ५८,३८७.१९ |
| नेट वर्थ | | | | ७१,२८९.५४ | ६१,८०७.१४ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २०.८६ | २०.०१ | ९६.०७ | ८८.३२ | १२६.३९ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २०.८६ | २०.०१ | ९६.०५ | ८८.३१ | १२६.३७ |
| प्रति भाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २०.४४ | १९.५८ | ९६.८६ | ८७.७५ | १२८.१२ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २०.४४ | १९.५८ | ९६.८४ | ८७.७४ | १२८.१० |

**टीपा :**

ए) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

बी) सेबी (लिस्टींग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ५२(४) च्या पोट-खंड (ए), (बी), (डी) व (ई) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींसाठी संबंधित आवश्यक माहिती एनएसई व बीएसई (www.nseindia.com/www.bseindia.com) यांच्याकडे दिली आहे आणि ती युआरएल (www.tatasteel.com) वर पाहता येईल.

सी) ०१ जुलै, २०१७ पासून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाल्यानंतर प्रवर्तनातून महसुलाची माहिती जीएसटीच्या निव्वळ दिली आहे. त्यानुसार ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या बारा महिन्यांसाठी प्रवर्तनातून महसूल आणि इतर खर्च निष्कर्षांत सादर केलेल्या मागील कालावधीशी तुलनायोग्य नाही.

**टी. व्ही. नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई: २५ एप्रिल, २०१९

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL

N-2701